# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९०६ /२०२५ दि. २८ /०५/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत MMRDA कडुन मे. मेघा इंजिनिअरींग आणि इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., हैद्राबाद या कंपनीस बोलीवली टनल चे काम देण्यात आलेले असुन सदर कामाचे ठिकाणी मशिनरी व इतर सामान उतरविण्यासाठी काही विहीत वेळेत हिलक्रीस्ट सोसायटी, मुल्ला बाग कडुन निलकंठ ग्रिन कडे जाणारा रस्ता बंद करुन वाहने विरुध्द दिशेने मार्गस्थ करावी लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) हिलक्रीस्ट सोसायटी, मुल्ला बाग कडुन निलकंठ ग्रिन कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **सत्या शंकर सोसायटी समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** हिलक्रीस्ट सोसायटी, मुल्ला बाग कडुन निलकंठ ग्रिन कडे जाणारी सर्व प्रकारची वाहने निलकंठ ग्रिन कडुन मुल्ला बागकडे येणाऱ्या रस्त्यावर सत्या शंकर सोसायटी येथुन बॅरिकेटींग केलेल्या मार्गाने विरुध्द दिशेने इच्छित स्थळी जातील.

**सदर वाहतूक अधिसूचना दिनांक २८/०५/२०२५ रोजी ते दिनांक २७/०६/२०२५ रोजी दिवसा १२:०० वा. ते सायंकाळी १८:०० वा. पावेतो व दिनांक २८/०५/२०२५ रोजी ते दिनांक २७/०९/२०२५ रोजी रात्रौ ००:०० वा. ते सकाळी ०६:०० वा. पावेतो अंमलात राहील.**

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :–**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

CamScanner

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner